# मिरा-भाईंदर महानगरपालिका
## बांधकाम विभाग
## मा. महासभा दि.०७/०६/२०१९
## // गोषवारा //

**प्रकरण क्रमांक ( ३१ )** :- मिरा-भाईंदर शहरामध्ये मार्केट किवा इतर सार्वजनिक हिताकरीता आरक्षण नसलेली जागा मोबदला देवून ताब्यात घेणेची कार्यवाही करणेबाबत..

मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील लोकसंख्या ही वेगाने वाढत असून सन १९९७ मध्ये विकास योजना तयार केलेली आहे. सद्यस्थितीत भाईंदर पश्चिम व भाईंदर पूर्व भागात आरक्षणाच्या जागा शिल्लक नसून पार्किंग, फेरीवाला हे रस्त्यावर बसत आहेत. त्यामुळे वाहतुकीस व रहदारीस अडथळा निर्माण होत आहे. सदर भागातील नागरीकांना सुखसोयी देता येत नाही. भाईंदर पूर्व व भाईंदर पश्चिम भागात काही ठिकाणी खाजगी जागा उपलब्ध असल्यास मनपाच्या आवश्यकतेनुसार सदर जागेचा भूसंपादनप्रमाणे टी.डी.आर किंवा जागेची अदलाबदल, वाटाघाटी इत्यादी मोबदला देऊन घेतल्यास सदर जागेवर सार्वजनिक सुविधेचे काम करता येऊ शकेल. तरी अशा जागा ताब्यात घेण्याची कार्यवाही करण्याबाबतचे धोरण निश्चित होणेस शिफारस आहे.

(शिवाजी बारकुंड)
**शहर अभियंता**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**